तक्रारदारतर्फे साक्षीदार क्र. १- दत्तात्रय दशरथ तरडे

शपथेवर जादा सरतपास तक्रारदाराकरीता वकील श्री. सी.पी.औदीछा

६) माझ्या शपथपत्रामधील संपूर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावरील सही माझी आहे. मी निशाणी यादी यु–१५ सोबत कंपनीत काम करताना दोन फोटो दाखल केले आहेत. त्यास **निशाणी यु–२३(subject to proof)** देण्यात आले. आता मला निशाणी यादी यु–१९ सोबत दाखल कागदपत्रं दाखविले. अ.क्र. १ पान क्र. १ ते ४ वर दि. २२/०५/२०२१ रोजीचे कंपनीतील कामगारांनी संघटनेचे सभासदत्व घेतल्याबाबतच्या युनियनचे पत्र आहे. त्यामध्ये माझे नाव अ.क्र. १ वर आहे. त्यास **आर्टीकल ए** देण्यात आले. अ.क्र. २ पान क्र. ५ ते २० वर मी समेट कार्यवाहीतील कागदपत्रं दाखल केली आहेत. त्यास **आर्टीकल बी** देण्यात आले. अ.क्र. ३ वर तक्रार यु.एल.पी. क्र. २४१/२०२१ ची प्रत दाखल केली आहे. त्यास **आर्टीकल सी** देण्यात आले. अ.क्र. ४ पान क्र. २९ ते ३९ वर मी प्रॉडक्शन रिपोर्टचे कागदपत्रं दाखल केली आहेत. त्या रिपोर्टमध्ये ऑपरेटर म्हणून माझी सही आहे. पान क्र. २९ ते ३४ वर Q.A. Inspector आणि Engg.Q.A. यांच्या सह्या आहेत. त्यास **निशाणी यु–२४(subject to proof)** देण्यात आले. पान क्र. ३५ वर जॉब कार्ड दाखल केले आहे. त्यावर माझे नाव प्रोसेस म्हणून नमूद आहे. त्यावर हेल्पर म्हणून मी सही केली आहे. पान क्र. ३६ ते ३८ वर जॉब कार्ड दाखल आहेत.

७) निशाणी यादी यु–२१ सोबत माझे दहावीचे गुणपत्राची प्रत दाखल आहे. त्याची मूळ प्रत आज मी न्यायालयात आणलेली आहे. त्यास **निशाणी यु–२५** देण्यात आले.

सरतपास पूर्ण.

सामनेवालेकरीता वकील यांच्या तोंडी विनंतीनुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत. माझेसमोर,

सही/–

पुणे (श्रीमती. टी. ए. सावंत)

न्यायाधीश,

दिनांक १७/०१/२०२५ प्रथम कामगार न्यायालय, पुणे.